खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १२३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१६ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचे बिगूल वाजले, १५ जानेवारीला मतदान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. राज्य निवडणूक आयोगाची आज अतिशय महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या महत्त्वाच्या टप्प्याच्या निवडणुकांची चर्चा आहे. याआधी राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली तेव्हाच स्पष्ट केलं होतं की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या दोन टप्प्यात होतील. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आधी राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींची निवडणूक घेतली. या निवडणुकीचे निकाल येत्या २१ डिसेंबरला लागणार आहेत. त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यातील निवडणुका होणार आहेत.

सुप्रीम कोर्टाने याआधीच राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ च्या आधी निवडणुका घेण्याचा आदेश दिला आहे.

त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून आता दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीची घोषणा झाली आहे. राज्यातील मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर शहरांसह एकूण २९ महत्त्वाच्या शहरांमधील महापालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. पण आता या निवडणुका होणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाचे अध्यक्ष दिनेश वाघमारे यांनी आज पत्रकार परिषद घेत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. आजच्या पत्रकार परिषदेत मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ३१ जानेवारी २०२६ च्या अखेर पर्यंत घेण्याचं नियोजन आणि त्या दृष्टीकोनाने केलेलं नियोजन याबाबत माहिती देण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केली आहे. मला आपल्याला सांगावसं वाटतं की, ही पत्रकार परिषद राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी आहे. महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुकीबाबत ही पत्रकार परिषद आहे. त्यापैकी २७ महापालिकांची मुदत संपलेली आहे. २०२० मध्येच मुदत संपली होती. मुंबईसह १८ महापालिकांची २०२२ मध्ये मुदत संपली होती. ४ महापालिकांची मुदत २०२३ मध्ये संपली होती. जालना आणि इचलकरंजी या नवनिर्वाचित महापालिका आहेत. त्यांची सुद्धा मी माहिती सांगणार आहे, असं आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले.

मुंबई महापालिका वगळता इतर ठिकाणी ३ ते ५ उमेदवारांना मतदान करावं लागणार




मुंबई महापालिकेत प्रभागात एक सदस्यीय प्रभाग आहे. मुंबई महापालिकेसाठी प्रत्येक मतदाराला केवळ १ मत द्यावं लागेल. तर २८ महापालिका या बहु सदस्यीय आहेत. बहुतांश महापालिकेत एका प्रभागात ४ उमेदवार निवडून द्यायचे आहेत. त्या महापालिकेत काही प्रभाग असेल आहेत की, जिथे ३ उमेदवार असतील तर काही प्रभागात ५ उमेदवार असतील. त्यामुळे या २८ महापालिकांमध्ये मतदारांना साधारणपणे ३ ते ५ मते द्यावे लागतील, अशी महत्त्वाची माहिती देखील त्यांनी दिली.

**✻ निवडणुकांचा कार्यक्रम कसा असेल?**

२९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी नामनिर्देश पत्र स्वीकारण्याचा कालावधी हा २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ असणार आहे. या नामनिर्देशन पत्राची छाननी ३१ डिसेंबर २०२५ ला होणार आहे. उमेदवारी माघारीची मुदत ही २ जानेवारी २०२६ अशी असणार आहे. तर निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी २०२६ ला होईल. या महापालिकांसाठी मतदान १५ जानेवारी होईल. तर १६ जानेवारी २०२६ ला मतमोजणी होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

## आयटीआय निदेशकांच्या समस्यांबाबत सकारात्मक बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेच्या दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी विविध मागण्यांसंदर्भात पुकारलेल्या एक दिवसीय धरणे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्या विशेष प्रयत्नांनी व प्रमुख उपस्थितीत खात्याच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेसोबत विविध मुद्द्यांवर बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठक प्रादेशिक कार्यालय, नागपूर येथे संध्याकाळी ५ ते ६.३० या वेळेत यशस्वीरित्या पार पडली. यावेळी नागपूर विभागाचे पदवीधर आमदार अभिजित वंजारी सुद्धा पूर्णवेळ उपस्थित होते. बैठकीला संचालक माधवी सरदेशमुख तसेच उपसचिव मठपती, सहसंचालक सूर्यवंशी, गावित (ऑनलाइन) हे चर्चेत उपस्थित होते.

हिवाळी अधिवेशनावरील एक दिवसीय धरणे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संघटनेने शासनास दिलेल्या पत्रात असलेल्या सर्वच तेराही मुद्द्यांवर यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली. अप्पर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी सर्व मुद्दे एक - एक करून संघटना, संचालनालय आणि मंत्रालय स्तर यामध्ये नेमके कुठे समस्या निवारणार्थ उपाययोजना आवश्यक आहे आणि किती कालावधीत उपाययोजना व्हावी, याबाबत कालमर्यादेत प्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने योग्य ते निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. दोन्ही आमदार महोदयांनी सुद्धा संघटनेची न्यायिक बाजू मांडली. यावेळी अप्पर सचिव मॅडम यांची प्रशिक्षण योजनेमधील सुधारणा आणि प्रशिक्षणार्थी कल्याण याविषयीची कळकळ वेळोवेळी जाणवून आली. त्यांनी यावर आवाहन करताच संघटना केवळ प्रशिक्षण याविषयावरच समर्पित एक बैठक आपणासोबत घेण्यास इच्छुक असल्याचे सांगताच त्यांनी लवकरच ही बैठक आपण आयोजित करू असे आश्वस्त केले. एकंदरीतच दीड तास चाललेल्या या बैठकीत अनेक समस्या निवारणार्थ निर्णय घेण्यात आलेले असून त्यादृष्टीने गतीने पावले उचलण्यात येतील याबद्दल अपर मुख्य सचिव यांनी आश्वस्त केले.

बैठकीनंतर आ. सुधाकर अडबाले यांनी मागील वर्षभरातील सभागृहातील कार्याची आढावा घेणारे सुधाकरपर्व पुस्तक अपर मुख्य सचिव वर्मा मॅडम यांना भेट दिले. महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेच्या वतीने संघटनेचे मार्गदर्शक, माजी सरचिटणीस तसेच नॅशनल फेडरेशन चे अध्यक्ष भोजराज काळे, माजी सरचिटणीस दुर्गपुरोहित, अमरावती शिक्षक मतदार संघाचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, राज्य अध्यक्ष विनोद पाटील, राज्य सरचिटणीस राजेश खडबडे, राज्य उपाध्यक्ष संजयकुमार खर्चे, राज्य सहचिटणीस शिवाजी ढुमने, राज्य सहचिटणीस मंगेश पुंडकर, राज्य खजिनदार प्रवीण देशकर, राज्य कार्यकारिणी सदस्य साहेबराव गुडधे, राज्याच्या महिला सदस्य शर्मिला कळमकर, नागपूर विभागाचे प्रेमकुमार भैसारे, पुणे विभागाचे अध्यक्ष नेताजी दिसले, अमरावती विभागाचे राहुल चौधरी, नागपूर विभागाचे सचिव सचिन मालिचकर, सचिव सिद्धार्थ मेहरे, धीरज सव्वालाखे आदींची उपस्थिती होती.

# जुन्या वादातून डोंबिवलीत निर्घृण खून!

## कोयता, चाकू व लोखंडी रॉडने ४० वार; १२ तासांत तिघांना अटक

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१५, डोंबिवली :** जुन्या वादाचा राग मनात धरून आरोपींनी कोयता, चाकू व लोखंडी रॉडने तब्बल ४० वार करत एका युवकाचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना डोंबिवली पूर्व भागात घडली. ही घटना घडून अवघ्या १२ तासांत डोंबिवली पोलिसांनी मुख्य आरोपीसह तिघांना अटक करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

डोंबिवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास कोपर स्टेशनजवळील आर. के. एंटरप्रायझेस परिसरात ही घटना घडली. नरेंद्र उर्फ काल्या भालचंद्र जाधव (वय ३७) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. आरोपी आकाश गौरीशंकर बिराजदार याने आपल्या साथीदारांसह जुन्या भांडणाच्या कारणावरून नरेंद्र जाधव यास अडवून तु येथे का आलास, तुला




जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत कोयता, चाकू व लोखंडी रॉडने डोके, मान, गळा, छाती, पोट, पाठ व हातपायांवर सपासप वार केले. या हल्ल्यात नरेंद्र जाधव यांचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान, हल्ला थांबविण्यासाठी गेलेल्या फिर्यादी शुभम राजेश पांडे (वय २७) यांच्यावरही आरोपींनी चाकूने वार करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी डोंबिवली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस उपआयुक्त परिमंडळ-३, कल्याण यांच्या आदेशानुसार स्वतंत्र तपास पथके तयार करण्यात आली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी दिवा पश्चिम परिसरात सापळा रचून मुख्य आरोपी आकाश गौरीशंकर बिराजदार (वय २९) याच्यासह दिवाकर महेशचंद्र गुप्ता (वय १८) व आलिफ शहादाब खान (वय १८) या दोन साथीदारांना अटक केली.या गुन्ह्याचा पुढील तपास सुरू

ही संपूर्ण कारवाई ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) संजय जाधव, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमांडे यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवली पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

# विम्याच्या पैशांसाठी मृत्यूचा बनाव, लिफ्ट मागणाऱ्याला कारमध्ये संपवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, लातूर :** दोन दिवसांपूर्वी लातूर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली होती. औसा वाढवणा या रोडवर एक कार जळत असलेल्या अवस्थेत सापडली. यामध्ये एकाचा मृत्यू झाल्याचंही समोर आलं. मात्र, यात स्वतःच्याच मृत्यूचा बनावट प्लॅन तयार केला आणि विमा कंपनीकडून एक कोटी रुपये लाटण्याचा प्रयत्न केला. मात्र, एका फोननं सर्व प्रकरण उघड झालं.

**नेमकं प्रकरण काय?**

लातूरमधील औसा तालुक्यातील वानवडा रोडवर १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता एका कारला आग लागून ती पूर्णपणे जळाली होती. कारमध्ये एक व्यक्ती जळून मृत्यूमुखी पडला होता. या प्रकरणाचा तपास करताना औसा पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने महत्त्वपूर्ण कामगिरी करीत गुन्हा उघडकीस आणला आहे. कर्जबाजारीपणामुळे विम्याची रक्कम मिळवण्यासाठी आरोपीने अनोळखी व्यक्तीला लिफ्ट देऊन त्याची हत्या करून कार जाळली असल्याचं समोर आलं आहे.

**स्वतःच्याच मृत्यूचा बनवला प्लॅन**

अटकेतील आरोपी गणेश गोपीनाथ चव्हाण (रा. विठ्ठल नगर, औसा) हा मयत बळीराम राठोड यांचा मेहुणा असून तो



त्यांची कार क्र. MH 43 AB 4200 वापरत होता. आर्थिक अडचणीत सापडलेला गणेश गेल्या तीन वर्षांपासून एक कोटी रुपयांचा टर्म इन्शुरन्सधारक होता. त्याच्यावर सुमारे ५७ लाख रुपयांचं कर्ज होतं. कर्ज फेडण्यासाठी व कुटुंबाला विम्याची रक्कम मिळावी यासाठी त्याने स्वतःची आत्महत्या किंवा दुसऱ्या व्यक्तीची हत्या करून तो स्वतःचा असल्याचा बनाव करण्याचा विचार गेल्या एक महिन्यापासून करत होता.

**लिफ्ट मागणाऱ्याची केली हत्या**

१३ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता घरातून बाहेर पडलेल्या गणेशने याकतपूर नपूर रोड चौकात गोविंद किशन यादव (वय ५०, रा. पाटील गल्ली, औसा) यांना लिफ्ट दिली. दारूच्या नशेत असलेल्या गोविंदला ड्रायव्हर सीटवर बसवून सीट बेल्ट लावले. सीटवर माचीसच्या काड्या व प्लास्टिक पिशव्या टाकून आग लावली व पेट्रोल टाकीचं झाकण उघडं ठेवून तो पसार झाला. कार पूर्ण जळाल्यानंतर गणेश सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग येथे पसार झाला होता. मात्र, पोलिसांच्या संयुक्त पथकाने त्याचा पाठलाग करून अटक केली.

**गणेश चव्हाण एका महिलेच्या संपर्कात**

गणेश चव्हाण या घटनेनंतर एका महिलेच्या संपर्कात होता. महिलेला ताब्यात घेतल्यानंतर गणेश वेगळ्याच नंबरवरून महिलेसोबत मेसेजवरत बोलत होता. यामुळे पोलिसांना त्याच्या लोकेशनचा सुगावा लागला आणि त्या दिशेने पोलीस रवाना झाले. त्याला सिंधुदुर्ग येथून ताब्यात घेतलं. सदरील महिलेची चौकशी अद्याप सुरू आहे. यामध्ये त्या महिलेला आधीच काही माहिती होते का? या दृष्टीने पोलिसांची चौकशी सुरू आहे. सदरील महिला त्याची मैत्रीण आहे की प्रेयसी याचाही शोध पोलीस घेत आहेत.

याप्रकरणी औसा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५२१/२०२५ कलम १०३ (१), २३८ भा.दं.वी. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, सहाय्यक निरीक्षक सदानंद भुजबळ व औसा ठाण्याचे निरीक्षक रेवणनाथ डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने हा गुन्हा उघडकीस आणला.




## आपला लाडका लक्ष्या

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, दे दणादण, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# गर्दीचे व्यवस्थापन आणि राजकारण यांची सरमिसळ..!!





## फुटबॉल प्रेमींच्या भावनांकडे दुर्लक्ष..?

कोलकात्यातील विवेकानंद युवा क्रांती मैदानात अर्जेंटिनाचा फुटबॉल स्टार लियोनेल मेसी याचे आगमन झाल्यावर त्याला पाहण्यासाठी हजारो प्रेक्षकांनी गर्दी केली होती. त्यामुळे शानदार समारंभाचे रूपांतर अभूतपूर्व गोंधळात आणि निषेध निदर्शनांत झाले. प्रचंड रक्कम भरून हजारो प्रेक्षकांनी मेसीच्या एका दर्शनासाठी या मैदानात गर्दी केली होती.

पण त्यांच्या पदरी अखेर निराशाच आली आणि चाहत्यांचा संताप झाला. नंतर जे झाले ते कधीही न कल्पना केलेले होते. बकेट, सीट्स, व्हीआयपी सोफ्यांची मोडतोड आणि जेथे हा कार्यक्रम होता तेथे नासधूस आणि काही ठिकाणी तर आग लावण्यात आली. अखेर आयोजकांना मेसीची भेट थोड्या वेळातच आटोपती घ्यावी लागली. आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणी चौकशी जाहीर केली आणि कार्यक्रमाची गैरव्यवस्था आणि गोंधळ का झाला याचा तपास सुरू आहे. पण या प्रकारात भारताची अब्रू गेली आणि जो देश विकासाच्या वाटेवर आहे त्याची लक्तरे कोलकात्यात निघाली. लोकांनी एका तिकिटासाठी तब्बल दहा हजार आणि १२ हजार इतके प्रचंड पैसे मोजले होते. पण त्यांना मेसीचे दर्शनही नीट होऊ शकले नाही. ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणी चौकशी जाहीर करताना मेसीची मनापासून माफी मागितली आणि या दुर्दैवी प्रकाराबद्दल आयोजकांना दोषी ठरवले. पण मुळात आपल्याकडे अशा कार्यक्रमांसाठी चोख व्यवस्था नाही? मेसीसारखे लोकप्रिय खेळाडू आपल्याकडे येत असताना आपल्याकडे अशा वेळेस प्रचंड गर्दी कशी हाताळायची त्याचे तंत्रच नाही? मुळात हे साल्ट लेक स्टेडियम इतक्या सेलेब्रिटीचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुरेसे होते का हा प्रश्न आहे.

त्या ऐवजी इडन गार्डन या स्टेडियमवर हा कार्यक्रम ठेवला असता, तर अशी गर्दी आणि ममता सरकारची बेअब्रूही झाली नसती. आता मेसीचा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या आयोजकाला पोलिसांनी विमानतळावर अटक केली आहे. त्याच्याविरोधात आता कडक कारवाई केली जाणार असे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. आता या गोंधळाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जोरदार शाब्दिक युद्ध जुंपले आहे. या गैरव्यवस्थेबद्दल दोघांनीही एकमेकांवर जबाबदार असल्याचे आरोप केलेत. पण सर्वात जास्त जबाबदारी ही तृणमूल काँग्रेसची होती. कारण तो पक्ष सत्ताधारी आहे. पश्चिम बंगालमध्ये २०२७ मध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. त्यादृष्टीने ममतांसाठी हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडणे हे महत्त्वाचे होते. पण कोलकाता प्रशासन त्याबाबतीत अपयशी ठरले.

कोलकाता, गोवा या शहरात फुटबॉल हा खेळ लोकप्रिय आहे. त्यामुळे या शहरांना वेगळाच दर्जा आहे. हे लक्षात घेऊन तरी निदान कोलकात्यात तरी फुटबॉल इव्हेंट असला तर तो व्यवस्थित पार पडावा अशी तेथील राज्य सरकारांनी दक्षता घ्यायला हवी. पण राज्य सरकारने आपली जबाबदारी नीट पार पाडली नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. या सर्व प्रकारात एकच गोष्ट समोर आली आहे ती म्हणजे गर्दी व्यवस्थापन आणि तिचे तंत्र याबाबतीत आपण अजून खूप मागे आहोत. गर्दीचे व्यवस्थापन आणि राजकारण यांची सरमिसळ यात आपण कुशल नाही हे या घटनेवरून सिद्ध झाले. जी घटना कोलकात्यासाठी ऐतिहासिक प्रसंग होऊ शकली असती ती या गैरव्यवस्थेमुळे आणि चाहत्यांच्या गोंधळामुळे बाजूला पडली आणि राजकीय युद्ध सुरू झाले. आता यातून मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा घटना घडतात तेव्हा त्यांची जबाबदारी निश्चित केली जाणे आवश्यक आहे. कायदा आणि सुव्यवस्था कोसळण्यास जे प्रसंग घडले ते भविष्यात पुन्हा घडू नयेत अशी उपाययोजना आपण करायला हवी. आता राज्यपालांनीही सी. व्ही. आनंदा बोस यांनी आयोजकांवर प्रखर टीका केली आणि ते म्हणाले की अत्यंत निष्ठूरपणे आयोजकांनी लियोनेल मेसीची गोट इंडिया टूर आयोजित केली आणि फुटबॉल प्रेमींच्या भावनांकडे दुर्लक्ष केले. आयोजकांनी या प्रकरणी केवळ आपल्या तुंबड्या भरून घेण्याकडे लक्ष दिले आणि त्यात प्रेक्षकांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या भावनांचा खेळ केल्याचा आरोप केला जात आहे.

आपल्याकडे परदेशी खेळाडू आणि अभिनेत्यांचे आकर्षण आहे आणि याचेच प्रत्यंतर आले. त्यामुळे अनेक मंत्री, खासदार आणि आमदारांनी मेसीला पाहण्यासाठी गर्दी केली होती. हजारो लोक मेसीला पाहण्यासाठी आले होते पण त्याची झलकही पाहू शकले नाही. काही प्रेक्षकांनी हा गैरव्यवहार असल्याचा आरोप केला. सुरक्षा व्यवस्थेचे या सर्व प्रकारात तीनतेरा वाजलेच. लियोनेल मेसीच्या आगमनाने फुटबॉल प्रेमी आनंदित झाले होते पण त्यांना निराशाच पदरी आली. आता बऱ्याच फुटबॉल प्रेमींनी विश्वासघात झाल्याचे जाणवते अशी प्रतिक्रिया दिली आहे आणि ती योग्य आहे. कारण या गोंधळाला जबाबदार सर्वस्वी आयोजकांचे गैरव्यवस्थापन आणि सावळागोंधळ होता. मेसीच्या कार्यक्रमाला साल्ट लेक स्टेडिमवर ८० हजार लोक जमले होते. त्यांनी गैरव्यवस्थापनामुळे तोडफोड केली. कोलकाता म्हणजे सिटी ऑफ जॉय म्हटले जाते, पण ८० हजार प्रेक्षकांसाठी सिटी ऑफ डिसॅस्टर ठरले.

फुटबॉल चाहत्यांसाठी ही सायंकाळ म्हणजे मोडतोडीचा कार्यक्रम ठरला. साल्ट लेक स्टेडियमवरील आसनव्यवस्था मोडीत काढण्यात आली. चाहत्यांचा अमूल्य वेळ आणि अफाट पैसा यात वाया गेला आणि त्याची आयोजकांना ना खंत ना खेद. त्यामुळे असे प्रकार होऊ नयेत असे वाटत असेल तर आयोजकांनी अतिदक्षता घेतली पाहिजे. बहिष्कार हा उपाय नाही पण लोकांनीही अशा कार्यक्रमांना जाण्यापूर्वी हजारवेळा विचार केला पाहिजे. मेसीचे दर्शन दुर्मीळ पण जेव्हा घडतो तो प्रसंग आयुष्यातला यादगार प्रसंग बनला पाहिजे. मेसी मानिया हे सांगतो, की कोलकात्यात मेसीचे दर्शन ज्यांना घडले नाही, त्यांना पैसे मोजूनही काहीच पदरी पडले नाही. कोलकात्यातील लोक निश्चितच असे कमनशिबी नाहीत.

**ह.भ.प शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर.**

## मांसाहार..



का योग्य मांसाहार
अनेक दिले दाखले
आम्ही कसे बरोबर
आराखडे ते आखले

कैक प्राणीपक्षीमासे
मिटक्यामार चाखले
तब्येतीचे कारण देत
व्यंजन मस्त चोखले

सकलजीवांची हत्या
रक्ताने तोंड माखले
शाकाहार करणाऱ्या
नेहमीचं गौण रेखले

जीवोजीवस्य जीवन
ब्रीद वाक्य बा रेखले
भले किती तरी जीव
जीवा आपले मुकले

झाडपाला उगा खाई
शाकाहारी ते चुकले
जात धर्म पंथ पक्ष रे
भेदा भेद मागे टाकले

आम्ही आता ग्लोबल
हात आभाळां टेकले
अभक्ष्य प्रकार नुरला
काहीही जाते विकले

शाकाहारी मांसाहारी
युध्द उगाच का पेटले
माझाचं हेका बरोबर
दुजाचे काही न पटले

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# अगोदर माणसाने माणूस बनावे!

मित्रांनो, जन्माला आल्यावर बालपणापासूनच प्रत्येकाचे जीवन ध्येय काही ना काही तरी ठरलेले असतेच. ते जीवन ध्येय साध्य करण्यासाठी प्रत्येक जण धडपडताना दिसत असतो. कोणाला डॉक्टर व्हावे वाटते, कोणाला इंजिनियर व्हावे वाटते, कोणाला उच्चपदस्थ अधिकारी व्हावे वाटते तर कोणाला कलेक्टर व्हावे वाटते. तसेच काहींना राजकीय क्षेत्राची आवड असते, काहींना चित्रकलेची व लेखन कलेची आवड असते, काहींना ड्रायव्हर बनण्याची इच्छा असते तर काहींना अगोदर माणूस बनायची इच्छा असते.

माणूस बनायची इच्छा असणारे लोक या पृथ्वीतलावर खूप कमी आहेत. म्हणजे प्रत्येकाला जीवनात काही ना काही तरी व्हावेच वाटते. त्यासाठी प्रत्येक जण जीवन ध्येय गाठण्यासाठी आपापल्या परीने वाटचाल करीत असतो. माणसाने आपले जीवन ध्येय निश्चित करून त्या दृष्टीने तशी योग्य वाटचाल केल्यास यश नक्कीच पदरात पडते. त्यासाठी प्रत्येक जण वेगवेगळी स्वप्ने पाहून त्या स्वप्नात स्वतःला हरवून जातो. आणि भविष्यात त्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी खूप खूप प्रयत्न करतो. प्रत्येक माणूस वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या पदावर नोकरी मिळवण्याचे स्वप्ने पाहतो. पण अगोदर माणूस बनायचे स्वप्न कोणताच माणूस पाहत नाही. माणसाने जन्माला आल्याच्या नंतर अगोदर माणूस बनायचा प्रयत्न केला पाहिजे. माणसासारखे वर्तन करून व माणुसकीला जीवापाड जपून माणुसकीची शोभा वाढवली पाहिजे. त्यासाठी अगोदर माणसाने माणूस बनणे नितांत गरजेचे आहे. प्रत्येक घरातील आई-वडील आपल्या मुलांना भविष्यात डॉक्टर, अभियंता, उच्चपदस्थ अधिकारी, कलेक्टर व मोठ्या पदावर मोठा राजकीय पुढारी होण्यासाठी स्वप्न बघण्यास सांगतात व त्या दृष्टीने वाटचाल करून स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करण्यास सांगतात. पण कोणतेच आई-वडील आपल्या मुलांना अगोदर माणूस बनायला व माणसासारखे वागायला सांगत नाहीत. माणसाने जीवनात पदार्पण केल्यावर सर्वप्रथम माणूस बनणे आणि माणसासारखे वर्तन करून माणुसकीला जीवापाड जपणे खूप आणि खूप महत्त्वाचे असते. आजकाल जगात माणसांची संख्या खूप वाढली आहे. दिवसागणिक लोकसंख्येत वाढ होत चालली आहे. संख्येने माणसे खूप झाली आहेत.

परंतु माणसांमध्ये माणुसकीचा लवलेश नसल्यामुळे माणसे असूनही त्यांची जनावरांसाठी गत झाली आहे. कारण आजकाल पृथ्वीतलावर खरी माणसे शोधायला गेल्यावर खूप कमी प्रमाणात आढळतील. परंतु ज्या माणसात माणुसकी नाही, अशी माणसे पृथ्वीतलावर पदोपदी आढळतील. आई-वडील आपल्या मुलांना मोठा क्लास वन अधिकारी हो म्हणून सांगतात. पण अगोदर माणूस बनायला का सांगत नाहीत? माणसासारखे वागून आणि माणसासारखे वर्तन करून माणुसकीला शोभा का आणत नाहीत? आई वडिलांचे कर्तव्य असते की, आपल्या मुलांवर संस्काराची योग्य पेरणी करून आणि संस्काराचे बाळकडू पाजून त्यांना सुसंस्कारी व चारित्र्यसंपन्न माणूस बनवणे आणि माणसासारखे वागायला व जगायला शिकवणे. आजकाल पृथ्वीतलावर खऱ्या माणसांची संख्या फार कमी झाली आहे. माणूस माणसासारखे न वागता सैतानासारखे वागत आहे. जीवन ध्येय गाठण्यासाठी माणुसकीला बगल देऊन नोकरीला काबीज करण्याचा प्रयत्न करत आहेत. मान्य आहे की तुम्ही, जीवनात काहीतरी बनण्यासाठी खूप खूप अभ्यास करत आहात, वाचन व चिंतन करत आहात, परंतु तुम्ही हे सर्व माणुसकीला विसरून आणि तिला पायदळी तुडवून जीवन ध्येय गाठण्याचा प्रयत्न करत असाल तर तो साफ चुकीचा आहे. तुम्ही भविष्यात मोठ्या पदावर विराजमान झाल्यास नोकरीच्या ठिकाणी माणुसकीने काम करणे हे प्रत्येक नोकरदाराचे कर्तव्य असते. जर तुमच्यात माणुसकी नसेल आणि तुम्ही मोठ्या पदावर अधिकारी असाल तर तुम्ही त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे जनसेवा करू शकणार नाही. एखाद्या पदावर कार्य करण्यासाठी माणसाला अगोदर माणूस बनावे लागते. आणि मानवता धर्म पाळूनच कार्य करावे लागते, तेव्हा कुठे आपण खरी जनसेवा केली असे म्हणता येईल. माणसात जर माणुसकी नसेल आणि तो एखाद्या पदावर कार्यरत असेल तर त्याची सेवा म्हणजे चाके नसलेल्या गाडी सारखी असणार आहे. कोणत्याही क्षेत्रात तुम्ही काम करा पण तुमच्यात माणुसकी जर नसेल तर ते काम तुम्ही यशस्वीपणे पार पाडू शकत नाहीत.

शाळेतील शिक्षकांमध्ये जर माणुसकी नसेल तर तो आपल्या विद्यार्थ्यांना खरंच चांगल्या प्रकारे शिक्षण देईल का? ज्या शिक्षकात माणुसकी नसते ते शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांवर शारीरिक व मानसिक छळ करतात. आतापर्यंत बरेच अमानुष शिक्षक आपल्याच विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करून मोकळे झालेले आहेत. म्हणजे तुम्ही नोकरी मिळावी म्हणून अभ्यास करत आहात, पण ती नोकरी मिळाल्यानंतर जर त्या नोकरीला व पेशाला योग्य न्याय द्यायचा असेल, तर त्यासाठी अगोदर आपल्यात माणुसकी असावी लागते आणि ती माणुसकी आता हल्लीच्या माणसांमध्ये नसल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार, बलात्कार, व्याभिचार, अत्याचार आणि अनाचार प्रचंड वाढला आहे. माणसे माणसासारखे न वागता मोकाट कुत्र्यासारखे वर्तन करत आहेत.

आपण माणसासारखे वर्तन करू लागलो आणि माणूस बनून आपल्या पेशाला न्याय देऊ लागलो तर या देशात खऱ्या अर्थाने माणुसकी आनंदाने नांदत राहील आणि या देशाचा विकास होत राहील, त्यासाठी प्रत्येकाने अगोदर माणूस बनायचा प्रयत्न केला पाहिजे. आणि माणूस बनून त्या दृष्टीने वाटचाल केली तर माणसाला आपल्या कर्तव्यात यशस्वी झाल्याचा आगळावेगळा आनंद मिळणार आहे. त्यासाठी गरज आहे ती माणसाने अगोदर माणूस बनण्याची आणि माणसासारखे वर्तन करण्याची...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## चंद्रपूर शहरातील वाहतूक सिग्नल तात्काळ सुस्थितीत करा - खा.धानोरकर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** शहरातील वाहतूक सिग्नल यंत्रणा कोलमडल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. सिग्नलवरील सर्व टायमर बंद ठेवले आहेत. तसेच म हानगरपालिकेने सिग्नलमधील बिघाड दूर करण्यासाठी तात्काळ कोणताही पुढाकार न घेतल्यामुळे शहरात अनागोंदी माजली आहे. त्यामुळे तातडीने प्रशासनाला जाब विचारत खा. प्रतिभा धानोरकर यानी, आता संपूर्ण शहराची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाल्याने होत असलेल्या अपघातांची आणि सामान्य नागरिकांच्या गैरसोयीची गंभीर दखल घेतली आहे. या गंभीर समस्येवर तातडीने लक्ष केंद्रीत करण्यात आले असून, संबंधित प्रशासकीय विभागांना सूचना करण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेला वाहतूक पोलीस विभाग आणि सिग्नलची देखभाल दुरुस्ती करणारी मनपा या दोन्ही संस्थांनी जनतेला वेठीस धरले आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मागणी केली आहे की, तात्काळ वाहतूक पोलिसांना बंद केलेले सर्व सिग्नल टायमर त्वरित सुरु करण्याचे आणि मनपा प्रशासनाला बिघाड झालेले सर्व सिग्नल युध्दपातळीनर दुरुस्त करुन तात्काळ कार्यान्वित करण्याचे आदेश देण्याचे त्यांनी सांगितले आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले की, ही किरकोळ समस्या नाही, ही थेट चंद्रपूरकरांच्या सुरक्षिततेशी आणि दैनंदिन जीवनाशी जोडलेला आहे. त्यांनी मागणी केली आहे की, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांनी तातडीने या विषयावर समन्वय साधून वाहतूक व्यवस्था पूर्ववत करावी. नागरिकांची गैरसोय थांबविण्यासाठी आणि वाढते अपघात नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने उपाययोजना न झाल्यास, या निष्क्रियतेबद्दल त्यांना सार्वजनिकरित्या जाब विचारला जाईल, असे त्यांनी सांगितले आहे.

## दिलीप बनसोड भाजपा नागपूर जिल्हा मंत्रीपदी नियुक्त



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** भारतीय जनता पार्टी नागपूर जिल्हा (काटोल) ग्रामीणचे अध्यक्ष मनोहर कुंभारे यांनी खापरखेडा येथील दिलीप बनसोड यांची भाजपा नागपूर जिल्हा ग्रामीण (काटोल) च्या मंत्रिपदी नियुक्ती केली आहे.

दिलीप बनसोड यांनी अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आपल्या अनेक सहकार्यासह काँग्रेस मधून भाजपामध्ये प्रवेश केला होता. बनसोड हे महानिर्मितीच्या खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या अध्यक्षपदी कार्यरत असून दरम्यान त्यांनी कंत्राटदाराच्या अनेक समस्या मार्गी लावलेल्या आहेत. ते नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात त्यांच्या या कामांची दखल घेवून भाजपा श्रेष्ठींनी त्यांची मंत्रीपदी नियुक्ती केली आहे.

बनसोड यांनी आपल्या नियुक्तीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सावनेरचे आमदार डॉ.आशिष देशमुख, भाजपा जिल्हा (काटोल) ग्रामीणचे अध्यक्ष मनोहर कुंभारे, भाजपा प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य डॉ. राजीव पोतदार आदींचे आभार मानले. बनसोड यांच्या नियुक्ती बद्दल परिसरात आनंद व्यक्त होत असून त्यांच्या निवडीचे सर्वश्री शांताराम गावंडे, रमेशचंद्र जैन, अशोक धोटे, देविदास मदनकर, राजेश रंगारी, अशोक तांदूळकर, बबलू ठाकूर, किशोर मुसळे, रामराव मोवाडे, विजय देशमुख, प्रमोद पिंगळे, मनोज बनसोड, शामराव सरोदे, सुनील जालंदर, राजेश गायकवाड, अनेश चवरे, चंद्रशेखर पानतावणे, विलास महल्ले, आशिष फुटाणे, नितीन गोस्वामी, अनीले भोयर, कुणाल भोसकर, महेश अढाऊ, रमेश लोणारे, प्रवीण धोटे, भूपेंद्र चतुर्वेदी, गणेश लोणारे, विनोद बरडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## दिव्यात भाजपची विकासासाठी तीन दिवसीय परीक्रमा सुरु

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१५, दिवा (ठाणे) :** दिवा भाजप च्यावतीने प्रगती कि दुर्लक्ष, दिवा मागतोय हिशोब हे ब्रीद वाक्य घेऊन दिव्यातील विकासाची परिक्रमा अशी रॅली काढण्यात आली यात दिव्यातील पाणी समस्या, दिवा पूर्व-पश्चिम रखडलेला उड्डाणंपुल, दिव्यातील जनतेसाठी मार्केट नाही, तलावाकडे दुर्लक्ष, सरकारी रुग्णालय आश्वासन, बस स्टॉप नाही असे अनेक समस्यानी दिवेकर त्रस्त असताना सत्ताधारी विकासाच्या नावाने मूग गिळून बसले आहे. त्यामुळे दिवा भाजपने ही विकासाची परिक्रमा जनतेच्या दारापर्यन्त नेत रोष व्यक्त केला आहे. ही परिक्रमा दिव्यात सतत तीन दिवस चालणार असून प्रथम दिवशी दिवा भाजप सर्व पदाधिकारी व कार्येकर्ते यांचा चांगला सहभाग लाभला असे दिवा भाजपचे मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी बोलताना सांगितले. सदर तीन दिवसीय परीक्रमेचा पहिला दिवस दत्त मंदिर, रिलायन्स टॉवर येथे करण्यात आली तर सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी एस.एम.जी शाळा व मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी दिवा पश्चिम येथील कुलस्वामिनी मंदिर येथून काढण्यात येणार आहे. प्रसंगी ठाणे जिल्हा उपाध्यक्ष विजय भोईर, गणेश भगत, विनोद भगत, अशोक पाटील, सपना रोशन भगत, सीमा भगत, समीर चव्हाण, अंकुश मढवी, जयदीप भोईर, श्रीधर पाटील, अशोक गुप्ता, जिलाजीत तिवरी, अमित गुप्ता, नितीन कोरगावकर, रवी मुननकर, विठ्ठल गावडे, किरण कोरगावकर आदी प्रमुख पदाधीकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार; मूल तालुक्यातील बेलगाटा येथील घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** मूल तालुक्यातील नागपूर हायवे रोडवर असलेल्या आदिवासी गाव बेलगाटा येथील रहिवासी पितांबर गुलाब सोयाम वय (३७) यांचा वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. ते दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी शनिवार ला गुरे चरायला जंगलात गेला होते. तेव्हापासून गावात किंवा घरी परच आलेच नाही. सायंकाळ पासून ते बेपत्ता हेते. बेलगाटा ग्रामस्थांनी सगळीकडे शोध घेतला तरी देखील गुराख्याचा पत्ता लागला नाही. मात्र, दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी गावकरी व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी जंगलात शोध मोहीम राबविली असता त्यांचा मृतदेह वनविभाग परिक्षेत्र सावली कक्ष क्रमांक १७६५ येथे आढळून आला. वाघाच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे बेलगाटा परिसरात व परिसरातील गावात भीतीचे व वाघाच्या दहशतीचे वातावरण पसरले आहे. सावली वनविभागाने नागरिकांना जंगलात जाताना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मृताच्या कुटुंबीयांना तात्काळ ४० हजार रुपयांची मदत सावली वनपरिक्षेत्र अधिकारी धुर्वे यांनी शासकीय मदत दिली.

## मुख्यमंत्री फडणवीस व जागतिक फुटबॉलपटू मेस्सी यांच्या हस्ते प्रोजेक्ट महादेवा'चा शुभारंभ



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, मुंबई :** मिशन ऑलिम्पिक २०२६ अंतर्गत म हाराष्ट्रातून अधिकाधिक सुवर्णपदके मिळवणे आणि २०३४ पर्यंत फुटबॉल विश्वचषकासाठी तयारीचे लक्ष्य ठेवून 'प्रोजेक्ट महादेवा' राबवण्यात येत आहे. या प्रोजेक्टमधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतील अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली म हाराष्ट्र शासनातर्फे 'प्रोजेक्ट महादेवा' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचा शुभारंभ सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी वानखेडे स्टेडियम येथे करण्यात आला. 'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA), व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मे शन फाउंडेशन (VSTF), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA), सिडको (CIDCO) आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जागतिक फुटबॉलपट्टू लिओनेल मेस्सी, अर्जेंटीनचे माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डिपॉल, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, खासदार प्रफुल्ल पटेल, भारतरत्न सचिन तेंडुलकर, भारतीय लोकप्रिय फुटबॉलपटू सुनील छेत्री, भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार राहुल भेके, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्राचे)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, अमृता देवेंद्र फडणवीस, गोट टूर प्रमोटर सत्तादूर दत्ता, टायगर श्रॉफ, अजय देवगण, कार्तिक आर्यन, दिनों मोरिया, जिंदाल ग्रुपच्या पार्थ जिंदल, वेदना जिंदल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'प्रोजेक्ट महादेवा' हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाचा उपक्रम आहे, जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल मधील प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेवून फुटबॉल मधील उच्च दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले, ३० मुली) पाच वर्षांची संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच अव्वल खेळाडू नक्कीच फिफा विश्वचषक मध्ये खेळतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

### प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही : सचिन तेंडुलकर

भारतरत्न सचिन तेंडुलकर म्हणाले की, जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि त्यांचे सहकारी भारतात आल्याबद्दल आणि तेही मुंबईत आल्याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार मानतो. मुंबईकरांनी ज्या प्रकारे या तिघांचे स्वागत केले ते अत्यंत अविस्म रणीय आहे. मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे आजचा क्षण हा अत्यंत अविस्म रणीय आहे. प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही. आज मला वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सन २०११ च्या क्रिकेटच्या विश्वचषकाची आठवण झाली. आजचा क्षण हा सुवर्ण अक्षराने लिहिला जाईल. खेळामध्ये खेळाडूंना चिकाटी जिद्द अत्यंत म हत्त्वाचे आहे लिओनेल मेस्सी जागतिक दर्जाचा खेळाडू असून त्याच्यामध्ये संवेदनशीलता त्याच प्रकारे त्यांनी या खेळाडूला दिलेल्या उत्तेजन अत्यंत म हत्त्वाचे आहे याबद्दल मी आभार मानतो आणि मेसीला व त्याच्या कुटुंबांना आरोग्यमय शुभेच्छा देतो.

### लिओनोल मेस्सी या नावाचा वानखेडे स्टेडियमवर जल्लोष

जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फुटबॉल प्रेमींना फुटबॉल प्रेक्षकांकडे भिरकवताच प्रेक्षकांनी लिओनोल मेस्सी या नावाचा जल्लोष केला. संपूर्ण मैदान मेस्सीच्या नावाने दुमदुमत होते.

या वेळेला जागतिक फुटबॉलपटू लिओनल मेस्सीला सचिन तेंडुलकर यांच्या नावाची दहा नंबरची जर्सी सचिन तेंडुलकर यांनी भेट केली. जागतिक फ ुटबॉलपटू लिओनाल मेस्सीनेही सचिन तेंडुलकर याला फुटबॉल भेट दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जागतिक फुटबॉलपटू लिओनोल मेस्सी यांनी जर्सी भेट दिली. पार्थ जिंदाल, वेदना जिंदाल यांनी जिंदाल ग्रुपतर्फे व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन मार्फत ७५ लाख रुपयांचा चेक प्रोजेक्ट महादेवाला दिला. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी तर्फे व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मे शन फाउंडेशन मार्फत ९९ लाख ९९ हजार रुपयांचा धनादेश प्रोजेक्ट म हादेवाला दिला.

### सक्षम आणि शाश्वत फुटबॉल विकास व्यवस्था उभी राहणार

'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम म हाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA), व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मे शन फाउंडेशन (तडढक्र), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखऋअ), सिडको (उखृउज) आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे धोरणात्म क दिशा, तळागाळातील सहभाग, व्यावसायिक फुटबॉल कौशल्य, पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय पाठबळ मिळून राज्यात एक सक्षम आणि शाश्वत फुटबॉल विकास व्यवस्था उभी राहणार आहे.

### प्रोजेक्ट महादेवा हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाचा उपक्रम

प्रोजेक्ट महादेवा हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे, जो संपूर्ण राज्यात तरुण फ ुटबॉल प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेण्यासाठी आणि त्यांना विकसित करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंना (३० मुले, ३० मुली) ५ वर्षांसाठी संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे.

## नागपूर येथे ढब्ल्यूसीएल च्या सीएमडी यांची आ.जोरगेवार यांनी घेतली भेट

### घुग्घुस लोखंडी पुलासाठी अतिरिक्त १ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी मंजूर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** घुग्घुस शहरातील अत्यंत महत्त्वाचा लोखंडी पूल मागील दोन वर्षांपासून रहदारीसाठी बंद असल्याने सामान्य नागरिकांसह व्यापारी बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पुलामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आ. किशोर जोरगेवार यांनी आज नागपूर येथे वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड चे सीएमडी जयप्रकाश द्विवेदी यांची तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुलाच्या रखडलेल्या कामाबाबत सविस्तर चर्चा केली. या बैठकी दरम्यान आ.किशोर जोरगेवार यांनी घुग्घुस शहरातील नागरिक, व्यापारी व काम गार वर्गाला भेडसावणाऱ्या अडचणी मांडत पुलाचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याचे ठामपणे सांगितले. यावर सकारात्मक भूमिका घेत सीएम डी जय प्रकाश द्विवेदी यांनी लोखंडी पुलाच्या कामासाठी अतिरिक्त १ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी तातडीने मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच हा निधी उद्याच संबंधित यंत्रणेकडे वर्ग केला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी या पुलाच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी ३ कोटी ७७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यामुळेच गेल्या दोन वर्षांपासून पुलावरून वाहतूक बंद ठेवावी लागली होती. आज आ. किशोर जोरगेवार यांच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे अतिरिक्त निधी मंजूर झाल्याने पुलाच्या कामाला पुन्हा गती मिळणार असून लवकरच पूल रहदारीसाठी खुला होण्याची आशा निर्माण झाली आहे. या भेटीमुळे घुघुस शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, आ. किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दीर्घ काळापासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

## स्थानिक उद्योगांच्या गरजेनुसार आयटीआयमध्ये नवे अभ्यासक्रम सुरु करा - मंगलप्रभात लोढा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** स्थानिक उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) नवे, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात यावेत, असे प्रतिपादन राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री ना. मंगल प्रभात लोढा यांनी केले. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता म ार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा नियोजन भवनात अल्पकालीन अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. अल्पकालीन अभ्यासक्रम ांमुळे युवकांना तात्काळ रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

त्यामुळे स्थानिक कारखाने व उद्योगांना आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हे आयटीआयचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि औद्योगिक आस्थापनांम ध्ये सातत्यपूर्ण व सकारात्मक संवाद आवश्यक असल्याचे ना. लोढा यांनी नमूद केले.

या बैठकीस व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, राज्य नवोपक्रम सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील, सहसंचालक पी.टी. देवतळे, उपायुक्त प्रकाश देशमाने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षिरसागर, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी वैभव बोनगीरवार, सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी आदी उपस्थित होते.

बैठकीत गोंडवाना विद्यापीठातर्फे प्रा. मनीष उत्तरवार यांनी कौशल्य विकास उपक्रमांचे सादरीकरण केले. डॉ. श्रीकांत पाटील यांनी मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजनेची माहिती दिली. चंद्रपूर जिल्ह्याचा कौशल्य विकास आढावा वैभव बोनगीरवार यांनी तर गडचिरोली जिल्ह्याचा आढावा प्राचार्य चौधरी यांनी सादर केला. संचालक माधवी सरदेशमुख यांनी दोन्ही जिल्ह्यांतील शॉर्ट टर्म कोर्सच्या कार्यपद्धतीवर मार्गदर्शन करून आयएम सी सदस्यांशी चर्चा केली आणि औद्योगिक आस्थापना व आयएमसी सदस्यांचे सहकार्य अत्यावश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बंडोपंत बोढेकर यांनी तर आभार सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी यांनी मानले. बैठकीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी वैभव बोनगीरवार, जिल्हा कौशल्य विकास केंद्र तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चंद्रपूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. बैठकीस जिल्ह्यातील शासकीय व खाजगी आयटीआयचे अधिकारी, प्रतिनिधी तसेच आयएमसी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अतिवृष्टीच्या जखमांवर मंत्री प्रताप सरनाईक ह्यांचा मायेचा हात!

# धाराशिवच्या शेतकऱ्यांसाठी १०१ देशी गाई म्हणजे नवसंजीवनी !

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१४, मीरा भाईंदर :** अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात पुन्हा एकदा आशेचा प्रकाश झळकला आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने अनेक शेतकऱ्यांची शेती, उभी पिके आणि गोठ्यातील पशुधन अक्षरशः वाहून नेले. कष्टाच्या जीवावर उभे असलेले संसार एका क्षणात उद्ध्वस्त झाले. अशा वेळी केवळ मदतीचा शब्द नाही, तर कृतीतून आधार देणारे नेतृत्व म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी संवेदनशीलतेचा जिवंत आदर्श घालून दिला आहे.



अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेत, त्यांच्या स्वखर्चातून आणलेल्या १०१ उत्तम प्रतीच्या देशी 'गीर' गाईंचे वितरण काल रविवारी सायंकाळी ७ वाजता सद्गुरू सदानंद महाराज यांच्या शुभहस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाईन) पार पडले. हा उपक्रम म्हणजे केवळ मदत नाही, तर संकटात कोसळलेल्या शेतकरी कुटुंबांना पुन्हा उभे करण्याचा निर्धार ठरला आहे.

यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, अवकाळी पावसाच्या तडाख्याने धाराशिव जिल्ह्यातील अनेक शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाले. शेतीबरोबरच कुटुंबाच्या उपजीविकेचा मुख्य आधार असलेली दूधदुभती जनावरे गमावल्यामुळे त्यांचे जीवनचक्रच थांबले. ही व्यथा स्थानिक पत्रकारांनी माझ्यापर्यंत पोहोचवताच, क्षणाचाही विलंब न करता मदतीचा निर्णय घेतला. संपूर्ण देशभरातून उत्तम प्रतीच्या देशी गाईंचा शोध घेतल्यानंतर गुजरातमधील 'गीर' प्रजातीची गाय शेतकऱ्यांसाठी निवडली. प्रत्येकी सुमारे ७५ ते ८० हजार रुपये किंमतीच्या या गाई महाराष्ट्रातील स्थानिक गाईंपेक्षा दुप्पट दूध देतात. सध्या देशी दुधाला चांगला दर मिळत असल्याने, या माध्यमातून शेतकऱ्यांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळेल आणि त्यांच्या कुटुंबाला भक्कम आर्थिक आधार प्राप्त होईल. विशेषतः कळंब, भूम आणि परंडा तालुक्यांमध्ये अतिवृष्टीचा फटका अधिक बसल्याने, या भागातील पशुधन गमावलेल्या शेतकरी कुटुंबांना स्वावलंबनाचा नवा मार्ग मिळावा, या उदात्त हेतूने हे गाईंचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम म्हणजे केवळ जनावरांचे वाटप नाही, तर संकटाच्या काळातही शासन आणि लोकप्रतिनिधी आपल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत, याची साक्ष देणारी मायेची हमी आहे. दूधाळ गाईंसोबतच शेतकऱ्यांच्या जीवनात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि नव्या आशेचे दूध पुन्हा वाहू लागले आहे.

# कंदीलाच्या उजेडापासून खाकी वर्दीपर्यंत !

## खडतर भटकंतीतून हवालदार पदापर्यंतचा भरत भारवाड यांचा प्रेरणादायी प्रवास

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** गायीच्या कळपासोबत भटकंती करणारा एक गवळी, कंदिलाच्या उजेडात अभ्यास करत पोलिस होण्याचे स्वप्न पाहतो आणि अखेर ते स्वप्न सत्यात उतरवतो. ही गोष्ट नाही, ही आहे दहेगावच्या भरत भारवाड यांची जिद्दीची कहाणी.

अवघ्या एक वर्षाचा असताना गुजरातमधून आई-वडिलांसोबत गायींच्या कळपासह तो राहत्यात आला. तिसरीपर्यंतचे शिक्षण गुजरातमध्ये मावशीकडे झाले. त्यानंतर पुन्हा आई-वडिलांसह नित्याची भटकंती सुरू झाली. दिवसभर हाती काठी घेऊन गुरे वळवायची आणि रात्री कंदिलाच्या उजेडात, एकट्याने तासनतास अभ्यास करायचा पक्के घर नव्हते, वीज नव्हती, पण स्वप्न मात्र ठाम होते.या खडतर जीवनातून बाहेर पडायचे होते, आई-वडिलांना कष्टाच्या आयुष्यातून मुक्त करायचे होते. शिक्षण सुरू ठेवत तो पदवीधर झाला. लग्न झाले, पत्नी आणि दोन मुले असा प्रपंच वाढला; पण ध्येय मात्र बदलले नाही.पोलीस व्हायचे!



मागील वर्षी गुजरातमध्ये पोलीस भरतीची संधी थोडक्यात हुकली आणि धक्का बसला. मात्र यंदा अधिक जोमाने तयारी केली आणि अखेर यशाला गवसणी घातली. गुरे वळण्याची काठी दूर फेकून, आता भरत भारवाड यांच्या हाती पोलीसाची लाठी येणार आहे.

पोलीस होऊन केवळ स्वतःचीच नाही, तर कुटुंबाची आणि पुढील पिढीची भटकंती संपवण्याचा त्यांचा निर्धार होता आणि तो आज साकार झाला आहे.

भरत भारवाड (वय २५) या गुजराथी गायींचे कळप वळवणाऱ्या युवकाचा ग्रामस्थांच्या वतीने काल सत्कार करण्यात आला. दहेगावचे माजी सरपंच भगवानराव डांगे, निवृत्त पोलीस अधिकारी मेघश्याम डांगे आणि राहत्याचे निवृत्त सहकार अधिकारी रमेशभाऊ शिंदे यांच्या पुढाकारातून हा सत्कार सोहळा पार पडला.

जिद्द, कष्ट, ध्येय आणि दुर्दम्य आशावाद असला, तर गवळ्याची काठी फेकून पोलीसाची लाठी हाती घेता येते. याचा जिवंत दाखला म्हणजे हवालदार भरत भारवाड.

# भूसंपादन करताना अन्याय झाल्याने शेतकऱ्यांनी दिले कार्यकारी अभियंता यांना निवेदन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१५, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील पुर्व विभागात हेटवणे डावा तिर कालवा मध्ये भूमीगत पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू केल्याने या भागातील उन्हाळी भात शेती व भाजीपाला करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं आहे. भूमिगत पाईप लाईनच टाकत असल्याने या पाण्याचा उपयोग जर व्यवसायिक काम करता उपयोग होत असेल तर शेतकऱ्यांचा विरोध राहील गेल्या अनेक वेळा हेटवणे मध्यम प्रकल्प कार्यालयात शेतकरी अर्ज दाखल करून कोणत्याही प्रकारचे मागण्या आजपर्यंत मान्य केल्या नाहीत त्यामुळे विविध मागण्यांसाठी हेटवणे डावा तिर कालवा संपादित संघर्ष शेतकरी यानी सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी हेटवणे मध्यम प्रकल्प कार्यलयाचे कार्यकारी अभियंता याना निवेदन दिले आहे.

गेल्या अनेक वर्षे शेतकऱ्यांचे मागण्या प्रलंबित आहेत व आजपर्यंत कोणतेच उत्तर समाधानकारक आले नाहीत. तरी सुद्धा शेतकऱ्यांच्या मागण्या प्रलंबित असून सुद्धा भूमीगत पाईप लाईनचे काम सुरू आहे. सार्वजनिक कामाला आमचं विरोध नाही. परंतु आम्ही केलेल्या मागण्या पूर्ण कराव्यात. संपुर्ण कालव्याचे सयुक्तिक मोजणी करणे, भूसंपादन मध्ये आलेले नवीन सर्व्हे नंबर व जुने सर्व्हे नंबरचे काही क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करून मोबदला देणे, संपादित जागेच्या शेतकऱ्यांचा शिल्लक मोबदला देवून नव्याने निवाड्याची प्रक्रिया पूर्ण करणे. या प्रलंबित मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी तस प्रकारचे निवेदन हेटवणे मध्यम प्रकल्प कार्यालयाचे कार्यकारी अभियंता यांना दिले. तसेच



जिल्हाधिकारी, प्रातअधिकारी, कार्यकारी संचालक कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सहाय्यक अभियंता, तहसीलदार, पेण पोलीस ठाणे, या कार्यालयाना सुध्दा निवेदन देण्यात येणार आहोत असे शेतकऱ्यांन कडून सांगण्यात आले आहे,

जर शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यां पूर्ण केल्यास तसेच शेतकऱ्यांन सोबत मिटींग लावून प्रलंबित मागण्याचे प्रश्न सोडवले तर कोणत्याही प्रकरचा आक्रोश राहणार नाही. जर मागण्या हेटवणे मध्यम प्रकल्पाने पूर्ण नाही केल्यास मोठा उद्रेक होईल. त्यांची सर्वस्वी जबाबदारी हेटवणे मध्यम प्रकल्पाची असेल शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. यावेळी महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर, दिपक पाटील, देवदास नाईक, राकेश उतेकर, जगदीश उतेकर, विनोद बामुगडे, आनंद भावे, स्वप्नील खामकर, लक्ष्मण निरगुडा आदी शेतकरी उपस्थित होते.

# थोडक्यात

## एनसीसी अधिकारी 'गौरव' सोहळा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** असोसिएट एनसीसी ऑफिसर वेल्फेअर बोर्ड, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी सन्मान सोहळा दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी भव्यदिव्य पद्धतीने साजरा झाला. या सन्मान सोहळ्याचे प्रमुख आयोजक संदीप गोसावी आणि विश्वनाथ पांचाळ होते. कार्यक्रमात एनसीसी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी वर्गाचा सत्कार करण्यात आला.प्रमुख पाहुणे ब्रिगेडियर शिरीष ढोबळे, कॅप्टन आशिष दामले, कॅप्टन मनोज भामरे, मुख्याध्यापिका सुमन सिंह, प्रमोद जगताप, विदुला साठे, यशोधन महाजन आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला मेजर डॉ.संजय चौधरी, मेजर डॉ.समीर पवार, मेजर डॉ.विजय डोनर,डॉक्टर अशोक डोनर, कॅप्टन डॉ.राजेंद्र पवार, कॅप्टन रोहित मुठे, कॅप्टन डॉ.सुनील कदम, कॅप्टन राजेंद्र बी.पवार, कॅप्टन सुंदर खडके, कॅप्टन बाळकृष्ण भोसले, लेफ्टनंट दिलीप वसावे, लेफ्टनंट बादल लाड, लेफ्टनंट भरत दागळे, चीफ ऑफिसर डी.टी. पारेख, चिफ ऑफिसर एम.रमण प्रसाद चारी,चीफ ऑफिसर शेषराव गायकवाड, चिफ ऑफिसर दिलीप शिंदे, चीफ ऑफिसर मॅथ्यू थॉमस, चिफ ऑफिसर प्रमोद पवार, चिफऑफिसर राजेश चव्हाण, चिफ ऑफिसर गोपाळ पाटील,चिफ ऑफिसर भाऊसाहेब शिंदे, चिफ ऑफिसर राजेंद्र उपाध्याय यांसारख्या अनेक कार्यकर्तृत्वान व प्रतिष्ठित व्यक्तीचा सन्मान करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक भान वाढवण्याचे उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले.एनसीसी अधिकारी व कॅडेट्स यांच्या निष्ठा, सेवाभाव आणि राष्ट्रीय बांधिलकीचा गौरव करण्यासाठी हा सन्मान सोहळा आयोजित केला होता.

## शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१५, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी मुखेड येथील उपजिल्हा रुग्नालयाच्या कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयाच्या विद्यार्थी, विद्यार्थीनीचे आरोग्य तपासनी मोहीम राबविण्यात आली. मुक्रमाबाद मुखेड येथील उपजिल्हा रूग्णालय येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.बी. गाडेकर व अधिपरिचारिका श्रीमती के.के.पवार यांच्या हस्ते वर्ग १ ते १० वर्गातील एकुन ५५० शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री मोरे बी.एस. व सर्व शिक्षक उपस्थित होते.



## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्म गावी नायगाव येथे सहल

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** रयत इंग्लिश मिडिअम स्कूल शिरवळ या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल नुकतीच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्म गावी उत्साहात पार पडली. या सहलीत इयत्ता पहिली ते चौथी मधील सुमारे ४१४ विद्यार्थी व शिक्षक हे सहभागी झाले होते.सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची, सामाजिक सुधारणा चळवळीची आणि स्त्री शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाची प्रत्यक्ष माहिती घेतली. सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थान स्मारक व माहिती फलक पाहिले. शिक्षकांनी सावित्रीबाईंच्या संघर्षमय जीवनाची, शिक्षण क्षेत्रातील क्रांतिकारी कार्याची तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सोबत केलेल्या समाज सुधारण्याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आपली शंका समाधान करून घेतली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव समानतेचे मूल्य आणि शिक्षणाचे महत्त्व याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. सहलीचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले असून सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी सहल यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. या सहलीसाठी (ड्चउ) सदस्य श्री.झगडे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे आणि पर्यवेक्षिका घाडगे यांचे ही मोलाचे मार्गदर्शन लाभले.




# जाखडी नृत्य स्पर्धेत गुहागर तालुक्यातील धाकुनाथ नृत्य कलापथक प्रथम क्रमांकाचे मानकरी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१४, मुंबई :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पटलावर गेली ६५ वर्षे अविरत कार्यरत असणारी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई, आयोजित सुशांत गणेश जाबरे संस्थापक (विभग फाउंडेशन) यांच्या विशेष सहकार्याने गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धा-२०२५, कलगी तुरा दिनदर्शिका २०२६ प्रकाशन आणि शाहीर गुणगौर व सामाज पटलावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव पुरस्कार वितरण सोहळा नुकताच भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह, दहिसर चेक नाका, महाजन वाडी, मीरारोड (पूर्व) मुंबई उपनगर येथे सुरेश ऐणारकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला. सदर त्रिवेणी सोहळ्यातील गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धा ही अवघ्या कोकण कलाविश्वात लक्षवेधी ठरली असून सदर स्पर्धेत संस्थेच्या ध्येय-धोरण नियमावलीखाली एकूण ८ संच अंतिम करण्यात आले होते. यात १) प्रकाश मित्र मंडळ-कळझोडी,सडेवाडी, ता.जि.रत्नागिरी, २) धाकुनाथ नृत्यकला पथक- मु.पो.भातगाव, तिसंग (वेलेवाडी), (गुहागर) रत्नागिरी, ३) शिवशक्ती नाच मंडळ-पूर्व तांबेवाडी, मु.पो.बामणोली (चिपळूण) रत्नागिरी, ४) श्री जुगाई देवी नृत्य कला पथक- मु.पो. काजुर्ली (गुहागर) रत्नागिरी, ५) शिवशक्ती नाच मंडळ- मांडवकर वाडी- मु.पो.कोतवली,मांडवकर वाडी, ता. जि.रत्नागिरी, ६) श्री जांग्लेश्वर नृत्य कला पथक- आगरनरळ कुणबीवाडी. मु.आगरनरळ,पो.देवूड,ता.जि. रत्नागिरी, ७) श्री कालकाई देवी कलामंच कोळबांद्रे, मु.पो.कोळबांद्रे पाटीलवाडी (दापोली) रत्नागिरी, ८) श्री. विठ्ठल रखुमाई नाच मंडळ- गवाणे (गवळी वाडी), ता.लांजा, जिल्हा - रत्नागिरी असे एकूण आठ संच कलापथकानी सहभाग घेतला होता,दिवसभर चाललेल्या स्पर्धेत सर्वच संचानी नृत्यात पारंपरिकता जोपासत नेत्रदीपक अशी जाखडी नृत्य सादर करत कलाप्रेमी रसिकांची मने जिंकली. स्पर्धेचे परीक्षक यांनी नृत्य सादरीकरणाचे अचूक परीक्षण करत शेवटच्या क्षणापर्यंत स्पर्धेची उत्सुकता वाढवली होती. यात परीक्षणाचे विभाग अंतिम करून परीक्षण नोंदवले गेले, परीक्षकांच्या परीक्षणातून अंतिम निकाल जाहीर करण्यात आला यामध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले धाकुनाथ नृत्य कला पथक- मु.पो.भातगाव तिसंग (वेलेवाडी ),गुहागर (रत्नागिरी) तसेच द्वितीय क्रमांकाने शिवशक्ती नाच मंडळ (मांडवकरवाडी) मु. पो. कातवली,खेड (रत्नागिरी) तर तृतीय क्रमांक: श्री जुगाई देवी नृत्य कालापथक,मु.पो.काजूर्ली,ता.गुहागर (रत्नागिरी) याप्रमाणे संच विजेते ठरले, विजेत्या संचाना प्रथम पारितोषिक ११,०००/-द्वितीय पारितोषिक ७,०००/- तृतीय पारितोषिक ५,०००/- सह प्रत्येकी विजेत्यांना आकर्षक स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र व ढोलकी देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट गायक विजेते सुभाष बावदाने यांना कराओके माईक तर उत्कृष्ट वादक विजेता ठरलेले नितेश वसंत लोखंडे यांस ढोलकी तसेच दोन्ही विजेत्यांना आकर्षक स्मृतीचिन्ह,सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.तर सहभागी संचाना डोलकी,सन्मानपत्र,सन्मानचिन्ह, देऊन सन्मानित करण्यात आले. सदर स्पर्धेला परिक्षक म्हणून स्पर्धा सरपंच: सुरेश ऐनारकर, संतोष गोविंद धारशे,कविता विभाग: डॉ. सूर्यकांत दत्ताराम चव्हाण,अनंत तांबे, सुरेश कदम, नृत्य विभाग: चंद्रकांत गोताड, झराजी वीर, चंद्रकांत धोपट, रंगबाजी (विभाग-१ ): सुरेश चिबडे, अशोक पाटिल, सुरेश गंगाराम वीर, रंगबाजी (विभाग-२): दिलीप शंकर नामे,प्रकाश पाजणे,तुषार पंदेरे अशी नामवंत मंडळी परीक्षक म्हणून लाभली होती. सदर स्पर्धेला प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद गांधी -उद्योजक/गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष मनसे राहुल शिंदे -विभग फाउंडेशन कैलास धाडवे ,समाज सेवक, अ‍ॅड दिपांजली कैलास धाडवे, प्रमिल पत्याने-उद्योजक,दिनेश कुरतडकर-समाज सेवक,रवींद्र मटकर-(अध्यक्ष न.लो.संस्था), अ‍ॅड राकेश रविंद्र साळुंखे -अध्यक्ष राष्ट्रवादी रत्नागिरी जिल्हा ओबीसी सेल, माधव कांबळे - (सहसेक्रेटरी) कुणबी समाजोन्नती संघ मुंबई,विभग फाउंडेशन टीम अशी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.कार्यक्रमाचे निवेदन संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे सहसचिव सुधाकर मास्कर यांनी केले.